# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

केंद्र क्र. १, १३ वा मजला, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, कुलाबा, मुंबई – ४०० ००५.
दूरध्वनी: ०२२–२२१६ ३९६४/६५/६९ फॅक्स: ०२२–२२१६ ३९७६
ई–मेल: mercindia@merc.gov.in
वेबसाईट: www.mercindia.org.in / www.merc.gov.in

जाहिरात क्र. १५/२०१३–१४

## जाहीर सूचना

### प्रारुप महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (बहु–वर्षीय वीज दर) (तिसरी सुधारणा) विनिमय, २०१४ वर जनतेकडून सूचना आणि हरकती मागविण्याबाबत

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (बहु–वर्षीय वीज दर) विनियम, २०११ मध्ये निर्मिती कंपनीला इंधनाच्या किंमतीतील किंवा उष्मांक मूल्यातील तफावतीमुळे ऊर्जा आकारांच्या दराच्या समायोजनात इंधन अधिभार समायोजन मासिक तत्त्वावर आकारण्यास आयोगाची कार्योत्तर मंजूरी घेण्याच्या अटीवर परवानगी आहे तर वितरण परवानाधारकाला मात्र ग्राहकांकडून हीच वसुली आयोगाच्या पूर्व–परवानगीने सहामाही तत्त्वावर करण्यास परवानगी आहे.

निर्मिती कंपनीच्या एकूण खर्चात इंधनावरील खर्चाचा मोठा भाग असतो तर वितरण परवानाधारकाच्या एकूण खर्चात वीज खरेदीवरील खर्चाचा मोठा हिस्सा असल्याने, वितरण परवानाधारकाच्या इंधन अधिभार समायोजनास मंजूरी देण्यात मुळातच विलंब होत असल्यामुळे एखाद्या विशिष्ट वर्षात खर्चाची वसूली कमी होऊ शकते. तसेच झेड–घटक आकारातील इंधन समायोजन खर्चाच्या भागातील आनुषंगिक खर्चाच्या भागामुळेदेखील ग्राहकांवर मंजूरी देण्यात होणाऱ्या अंगभूत विलंबाचा अतिरिक्त बोजा पडतो.

त्यामुळे आयोगाने, वरील बाबी विचारात घेऊन, वितरण परवानाधारकाला इंधन अधिभार समायोजनाची वसुली ग्राहकाकडून मासिक तत्त्वावर करण्यास परवानगी देण्याकरिता महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (बहु–वर्षीय वीज दर) विनियम, २०११ मध्ये प्रस्तुत सुधारणा करण्यासाठी जनतेशी विचार–विनिमय करण्याचे ठरविले आहे.

प्रारुप महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (बहु–वर्षीय वीज दर) (तिसरी सुधारणा) विनियम, २०१४ आयोगाच्या **www.mercindia.org.in / www.merc.gov.in** या संकेत स्थळावर उतरवून घेण्याच्या स्वरुपात उपलब्ध आहे. या प्रारुप विनियमावर आयोग याद्वार जनतेकडून/ हितसंबंधितांकडून सूचना / हरकती मागवित आहे. सदर सूचना / हरकती (१+५) सहा प्रतींमध्ये, आयोगाचे सचिव, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, १३ वा मजला, केंद्र क्र.१, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई – ४००००५, (फॅक्स –०२२–२२१६३९७६; ई–मेल : **mercindia@merc.gov.in**) यांना दि. ३१ जानेवारी,२०१४ रोजी किंवा त्यापूर्वी मिळतील अशा रितीने पाठवाव्यात.

आयोगाला ३१ जानेवारी, २०१४ रोजी किंवा त्यापूर्वी प्राप्त होणाऱ्या सर्व सूचना आणि हरकती विचारात घेण्यात येतील.

**मुंबई,**
**दिनांक: ०४.०१.२०१४**

**स्वाक्षरी/–**
**सचिव, मविनिआ**